# कमला कॉलेजमध्ये ई लर्निंगची सुविधा

## ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

माहिती तंत्रज्ञानाच्या युगात येणाऱ्या बदलांना सामोरे जाणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे कमला कॉलेजमध्ये ऑनलाइन लर्निंग मॅनेजमेंट सिस्टिम सुरू केली आहे. असे प्रतिपादन ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी केले. ऑनलाइन लर्निंग मॅनेजमेंट सिस्टिमच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

डॉ. पाटील यांनी अत्याधुनिक तांत्रिक बदलांना सामोरे जाण्यासाठी कमला कॉलेजमधील बारा वर्ग स्मार्ट क्लास रूम केले आहेत. यामध्ये कॉम्प्युटर, एलसीडी यांसारखी आधुनिक साधने उपलब्ध करून देण्यात आली आहेत. तसेच सुसज्ज सेमिनर हॉल, वाय-फाय सुविधा उपलब्ध आहे.



कोल्हापूर : कमला कॉलेजमधील ई-लर्निंगच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. क्रांतिकुमार पाटील. सोबत प्राचार्य जे. बी. पाटील, प्रशांत कल्लोळी, उर्मिला कदम.

ग्रंथपाल उर्मिला कदम म्हणाल्या, संगणक, इंटरनेट सुविधा, नवीन काहीतरी शिकण्याची जिद्द व उर्मी असेल तर ई-लर्निंग हे नवीन पिढीसाठी खूप मोठे अवकाश आहे. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ज्ञानाची अनेक कवाडे आपल्या समोर खुली होतील. ई कमला मध्ये कोणकोणत्या सुविधा उपलब्ध आहेत, याची सविस्तर माहिती दिली. तसेच सायबर स्पेसमध्ये आपण आपली जागा बुक करून त्यामध्ये आपले सर्व ई साहित्य संग्रहीत करून ठेवले जाते. त्याचा वापर विद्यार्थांना त्यांच्या अभ्यासक्रमामध्ये होतो. यावेळी विविध माहिती स्त्रोतांचा परिचय करून दिला. त्याचबरोबर ऑनलाईन लायब्ररी ओपॅक, नॅशनल डिजिटल ग्रंथालय या सारख्या विविध लिंक ही सिस्टिममध्ये उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थीनी व शिक्षकांचा वेळ वाचविता येईल. या ऑनलाइन लर्निंग सिस्टिम प्रोफेशनल सॉफ्टवेअर डेव्हलपर कंपनी कडून तयार करण्यात आली आहे. डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अनघा पाठक यांनी आभार मानले. प्रा. अनिल घस्ते यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. यावेळी प्राचार्य डॉ. जे. बी. पाटील, प्रशांत कल्लोळी, आदी उपस्थित होते.